# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक 09/04/2009 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.01) इतिवृत्त

गुरूवार दिनांक ०९ एप्रिल २००९ रोजी मा.पिठासीन अधिकारी श्रीमती रिचा बागला, अप्पर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समिती विशेष सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलीक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे सकाळी ११-३२ वा.वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला प्र.आयुक्त श्री.उध्दव घुगे, नगरसचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सदस्य उपस्थित होते.

०१. श्री.कटकटे सतिष विश्वनाथ
०२. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
०३. श्री.जावेद हसन खान
०४. श्री.गवळी रविकांत काशिनाथ
०५. श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
०६. श्रीमती मोमीन सफिया फिरदौस
०७. श्री.सुरे सिताराम इसराम
०८. श्री.सोनवणे कचरू श्रीपत
०९. श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार
१०. श्री.कैसर खान बद्रोद्दिन खान
११. श्रीमती खान मेहरून्निसा हमीद खान
१२. श्री.घडमोडे भगवान देविदास
१३. श्री.देसरडा प्रशांत सुभाष
१४. श्री.प्रल्हाद गणपतराव निमगांवकर
१५. श्री.पांडे विनायक प्रभाकर

**विषय क्र.१ :**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती,प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ अन्वये स्थायी समिती सभापती पदावर निवड करणे.

**संवाद :**

नगर सचिव : मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ चे नियम २ (२) चे तरतूदीप्रमाणे मा.विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांचेशी विचार विनिमय केल्यानंतर स्थायी समितीचे सभापती पदाची निवडणूक घेण्यासाठी स्थायी समिती विशेष सभेची दिनांक ०९/०४/२००९ वेळ सकाळी ११.३० वाजता ही निश्चित करण्यात आली आहे.

नियम क्र. ४ अन्वये या विषेश बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा.विभागीय आयुक्त किंवा त्यांचा प्रतिनिधी असेल, जो अतिरिक्त आयुक्तांच्या कमी दर्जाचा नसावा, अशी तरतूद आहे. त्यानुसार मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी त्यांचे आदेश जा.क्र.०९/साप्र/कक्ष-४/नपाप्र/आ/कावि, दिनांक ०४.०४.२००९ अन्वये या स्थायी समिती विशेष सभेचे पीठासीन अधिकारी म्हणून काम करण्यास मा.श्रीमती रिचा बागला,अप्पर विभागीय आयक्त,औरंगाबाद यांना प्राधिकृत केले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती,प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ अन्वये स्थायी समिती सभापती पदासाठी निवड करण्याकरीता दिनांक ०४/०४/२००९ रोजी स्थायी समिती विशेष बैठकीची सूचना निर्गमित करण्यात आली आहे. तसेच निवडणूक घेणे संदर्भात परिपत्रक क्रमांक मनपा/नस/ २००९/१८६,दिनांक ०४.०४.२००९ निर्गमित करण्यात आले आहे. व सदर परिपत्रका सोबत नियमांच्या प्रतीही देण्यात आलेले आहेत. दिनांक ०८/०४/२००९ पर्यंत नामनिर्देशन पत्र वाटप करणे व स्विकारणेची कार्यवाही पूर्ण झाली असून दिनांक ०८/०४/२००९ रोजी कार्यालयीन वेळेत स्थायी समिती सभापती पदासाठी खालीलप्रमाणे उमेदवारांचे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत.

१. श्री.अ.साजेद अ.सत्तार
२. श्री.पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
३. श्री.नारायण तिलोकचंद कुचे

(नगर सचिव हे स्थायी समिती सभापती पदासाठी प्राप्त झालेले नामनिर्देशन पत्र छाननीसाठी पीठासीन अधिकारी यांचेकडे सुपूर्द करतात.)

पिठासीन अधिकारी : मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती,प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे)नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ चे नियम क्र.५ (२)अन्वये सभापती स्थायी समिती पदासाठी आता प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात येत आहे.

श्री.देसरडा प्रशांत : छाननीची प्रक्रिया कशा पध्दतीने असणार आहे

मा.पिठासीन अधिकारी : छाननी करतांना एक -एक उमेदवाराचे नाव अ.क्र.नुसार घेणार आहोत.

श्री.भगवान घडमोडे : एकाच उमेदवाराचे चार चार नामनिर्देशन पत्र भरून दिलेले आहे त्याची छाननी कशा पध्दतीने करणार आहे.

नगर सचिव :प्राप्त झालेल्या अनुक्रमांक प्रमाणे नामनिर्देशन पत्राची छाननी होईल.

श्री.देसरडा प्रशांत :नामनिर्देशन पत्रावरी सुचक अनुमोदकाच्या सहया आहेत किंवा नाहीत याची खात्री करावी.

(पीठासीन अधिकारी नगर सचिव यांच्या मदतीने छाननी करतात)

| | |
|---|---|
| मा.पिठासीन अधिकारी | : अ.क्र.१ पासून सुरू करण्यात येते. |
| नगरसचिव | :नामनिर्देशन पत्राचा अ.क्र.१ दिनांक ६-४-२००९ रोजी प्राप्त नामनिर्देशन पत्र उमेदवाराचे नाव श्री.अ.साजेद अ.सत्तार सुचकाचे नाव श्री.जावेद हसन खान अनुमोदकाचे नाव श्रीमती खान मेहरून्नीसा खान<br>(अ.क्र.१ चे नामनिर्देशन पत्र व त्यावर असलेली नामनिर्देशन सादर करणारे उमेदवार,सुचक व अनुमोदक यांचे सहया असल्याची मा.पीठासीन अधिकारी यांनी प्रत्यक्ष विचारणा केली उमेदवार,सुचक व अनुमोदक यांनी सदर नामनिर्देशन पत्रावर त्यांची स्वाक्षरी असल्याचे मान्य केले) |
| मा.पिठासीन अधिकारी | :अ.क्र.१ चे उमेदवार श्री.अ.साजेद अ.सत्तार यांचे नामनिर्देशन पत्र वैध ठरविण्यात येते. नगरसचिव यांनी पुढील क्रमांकाचे नाव वाचावे. |
| नगरसचिव | :अनुक्रमांक २ दिनांक ६-४-२००९ रोजी प्राप्त नामनिर्देशन पत्र उमेदवाराचे नाव श्री.अ.साजेद अ.सत्तार सुचकाचे नांव श्री.पाथ्रीकर दत्ताभाउ अण्णासाहेब अनुमोदकाचे नाव श्री.सोनवणे कचरू श्रीपत<br>(या वेळी पीठासीन अधिकारी सुचक व अनुमोदक कोण आहेत व ते सभागृहात आहेत याची खात्री करून घेतात.) |
| श्री.दत्ताभाऊ पाथ्रीकर | :मी या नामनिर्देशन पत्रावर सही केलेली नाही. |
| श्री.कचरू सोनवणे | :मी या नामनिर्देशन पत्रावर अनुमोदक म्हणून सही केली आहे. |
| मा.पिठासीन अधिकारी | :आता सुचक जे असतील त्यांनी मत मांडावे. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :मी कुठल्याही नामनिर्देशन पत्रावर सही केली नाही तसे मी ॲफिडेव्हिट करून दिलेले आहे.मला कळले की माझे नाव टाकून कुणी तरी फॉर्म भरला म्हणून मी ॲफिडेव्हिट करून दिले आहे ही माझी सही नाही. |
| मा.पिठासीन अधिकारी | :मी आपणांस पुन्हा विचारणा करते की श्री.अ.साजेद अ.सत्तार यांचे अ.क्र.२ चे नामनिर्देशन पत्र सादर झालेले आहे त्यावर श्री.दत्ताभाउ अण्णासाहेब पाथ्रीकर याची सुचक म्हणून सही आहे ही सही आपली आहे का? |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :ही सही माझी नाही मी ॲफिडेव्हिट करून दिले आहे. सुचक म्हणून माझे नाव टाकले ते चुकीचे आहे.<br>(याच वेळी मा.पिठासीन अधिकारी यांनी स.सदस्य श्री. दत्ताभाउ अण्णासाहेब पाथ्रीकर यांनी माझी सही नसल्याचे जे ॲफिडेव्हिट करून दिले ते वाचून पाहतात.) |
| मा.पिठासीन अधिकारी | :ही सही आपली नाही अस आपण म्हणतात. आपण हि बाब सभागृहात शपथेवर सांगता?. |
| श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर | :हो मी शपथेवर सांगतो मी ॲफिडेव्हिट करून दिलेले आहे. |
| मा.पिठासीन अधिकारी | :अनुमोदक म्हणून श्री.कचरू श्रीपत सोनवणे आहे का ? आपण बोलावे हि सही आपली आहे काय? |
| श्री.कचरू सोनवणे | : अनुमोदक म्हणून माझी सही आहे.ती मी केलेली आहे. |
| श्री.अ.साजेद अ.सत्तार | :दिं.६-४-२००९ रोजी मी व स.सदस्य श्री. कचरू सोनवणे आम्ही दोघे स.सदस्य श्री. दत्ताभाउ अण्णासाहेब पाथ्रीकर यांचे घरी गेलो होतो श्री.कचरू सोनवणे यांनी अनुमोदक म्हणून तर श्री.दत्ताभाऊ अण्णासाहेब पाथ्रीकर यांनी सुचक म्हणून सही केली .तसे ॲफिडेव्हिट सादर केलेले |

आहे.
(याच वेळी मा. पिठासीन अधिकारी यांनी स.सदस्य श्री.कचरू सोनवणे यांनी दिलेले ॲफिडेव्हिट पहातात.)

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :जेंव्हा मी स्वत:चे ॲफिडेव्हिट दिलेले आहे ते मी स्वत: दिलेले आहे माझ ी सही आहे म्हणून सांगतो की दुसरे व्यक्ती माझी सही करून देतो हे कसे शक्य आहे.याचा अर्थ असा की प्लॅनिगने खोटे वगैरे केलेले आहे मी उमेदवार राहू नये याकरीता केलेले आहे दिं.६-४-२००९ रोजी महापालिकेत जे म्हणतात की सही वगैरे घेतली येथे एकही व्यक्ती नव्हती. माझी सही नाही जर दुसरे कुणी म्हणत असेल की ही माझी खरी सही आहे म्हणजे दुस-यांचे ॲफिडेव्हिट माझेकरीता कशासाठी माझे ॲफिडेव्हिट हे माझे करीता आहे.मी ओपनली सांगतो समोर शपथेवर सांगतो. दुसरे सांगणार का हि सही माझी आहे म्हणून.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :सदर उमेदवार मी आम्ही दोघे एकाच पक्षाचे आहोत मी पक्षाचा अधिकृत उमेदवार आहे पक्षाने मला अधिकृत उमेदवारी दिलेली आहे त्यानंतर मी व स.सदस्य श्री. कचरू सोनवणे आम्ही महापालिकेत त्यांची सही घेतलेली नाही ॲफिडेव्हिटमध्ये स्पष्ट दिले आहे की आम्ही त्यांचे घरी जावून सही घेतलेली आहे.त्यांना फॉर्म भरणा करायचा होता म्हणून तिस-या दिवशी त्यांनी ॲफिडेव्हिट दिले दिं.६ तारखेला ११-०० वा.सही घेतलेली आहे जे ॲफिडेव्हिट स.सदस्य श्री. पाथ्रीकर दत्ताभाउ यांनी दिले ते दिं.८-४-०९ रोजी दुपारी दिलेले आहे.

मा.पिठासीन अधिकारी :अनुमोदक किंवा इतरांना काही बोलायचे असल्यास त्यांनी बोलावे. अजून काही बोलायचे आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :पिठासीन अधिकारी म्हणून आपल्याला काय निर्णय जो घ्यायचा तो घ्यावा.

श्री.भगवान घडमोडे :स. अ.साजेद अ.सत्तार यांनी उमेदवारी अर्ज भरलेला आहे त्यावर सुचक म्हणून स.श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर त्यांनी स्वत:सभागृहात सांगतात की मी सुचक नाही जे व्यक्ती स्वत: सांगतात मी सुचक नाही म्हणून दुस-यांनी ॲफिडेव्हिट दिले काय नाही दिले काय करीता विनंती की या नामनिर्देशन फॉर्मवरील सुचक म्हणून श्री. दत्ताभाउ पाथ्रीकर यांचे नावे गृहीत न धरता आणि संबधीत उमेदवाराचा एक अर्ज वैध झालेला आहे त्यानंतर ते ॲफिडेव्हिट देतात याचा अर्थ त्यांचे इन्टेशन वेगळे आहे.जर त्यांचा एक फॉर्म वैध झालेला आहे. दुसरा उमेदवार स्पर्धेत येवू नये म्हणून हे काळे कृत्य आहे म्हणून अ.क्र.२ चा फॉर्म अवेध ठरविण्यात यावा.अशी विनंती करतो.

श्री.देसरडा प्रशांत :अ.क्र. २ च्या फॉर्म वर सुचक म्हणून श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर तर अनुमोदक म्हणून श्री.कचरू सोनवणे यांची सही आहे. दिंनाक १७ फेब्रुवारीचे जे परीपत्रक आहे त्यात सुचक व अनुमोदक हा स्थायी समिती सभापतीचा उमेदवार होवू शकत नाही असा उल्लेख यात आहे या उल्लेख फायदा धेवून आपण स्थायी समिती सदस्यांच्या सहया घ्यायच्या आणि आपला फॉर्म तिथे दाखल करायचा याचा अर्थ असा होतो की, दुसऱ्या कोणत्याही सदस्यानी फॉर्म भरता येवू नये म्हणून हे केलेले कृत्य आहे. मा.दत्ताभाउ पाथ्रीकर यांचा फॉर्म सभापती पदासाठी आहे आणि

याच्याकडे चार फॉर्म असेल तर नंबर दोनचा फॉर्मवर आत्ता छाननी चालू आहे. नंबर एकचा फॉर्म वैध झालेला आहे कोणत्याही उमेदवारावर किंवा एखाद्या व्यक्तीवर अन्याय झाल्याचे दिसुन येत नाही परंतु मा.दत्ताभाउ पाथ्रीकर यांच्या फॉर्मची छाननी अजून बाकी आहे. त्याछाननीवरून त्यांचा फॉर्म राहिल किंवा नाही हे ठरणार आहे. त्यामुळे मी विनंती करतो की कोणत्याही एका उमेदवारास मतदानाच्या प्रक्रीयेतुन दुर करण्यासाठी हे षडयंत्र आहे त्यामुळे एखादयाचे आपण निवडणुक लढवित आहोत आणि निवडणूक लढविण्यासाठी त्यांची बोगस सही करायची आणि ती दाखल करायची तर एखाद्या व्यक्तीवर तो अन्याय होउ शकतो.यांचा जर हा फॉर्म अवैध झाला तरी यांच्यावर अन्याय होणार नाही. अनुक्रमांक १ चा फार्म यांचा सलेक्ट झालेला आहे. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीला निवडणुक लढविण्यापासून वंचित राहू नये. त्यामुळे हा फॉम रद्द करावा अशी मी आपणांस विनंती करतो.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :मला दोन तिन मुद्यांवर बोलायचे आहे.

मा.पिठासीन अधिकारी :आपल्याला बोलण्याची संधी दिलेली आहे.

श्री.अ.साजेद अ.सत्तार :यात राजकरण करत नाही कायदेशीर मुद्दा मांडत आहे. मागच्या निवडणूकीच्या वेळेस भारतीय जनता पार्टीचे सदस्य श्री.संजय जोशी यांचे चार नामनिर्देशन पत्र आलेले होते.

मा.पिठासीन अधिकारी :नामनिर्देशन पत्राच्या छाननी संबधी चर्चा करावी.

श्री.भगवान घडमोडे :मागील निवडणुकीचा संदर्भ घेण्याची इथे गरज नाही.

(याचवेळी अनेक सदस्य बोलतात.)

मा.पिठासीन अधिकारी :सर्वांनी कृपया जागेवर बसावे. बोलण्याची संधी देण्यात आलेली आहे. उपस्थित सर्व सदस्यांनी त्यांचे मत व्यक्त केलेले आहे. आता छाननी चालू आहे. आता छाननी करण्यात आलेली आहे. छाननीचा निर्णय जाहीर होणार आहे. अ.क्र.२ श्री.अ.साजेद अ.सत्तार यांचे सूचकाचे नांव पाथ्रीकर दत्ताभाउ अन्नासाहेब म्हणून देण्यात आलेले आहे. फॉममध्ये अनुमोदकाचे नांव सोनवणे कचरू श्रीपत म्हणून दिलेले आहे. पाथ्रीकर दत्ताभाउ अन्नासाहेब यांनी शपथेवर सांगीतले आहे आणि ॲफिडेवीट दिलेले आहे की हि सही त्यांची नाही. सुचक म्हणुन त्यांनी सही केलेली नाही. म्हणून अ.क्र.२ अब्दुल साजेद अब्दुल सत्तार यांना औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सभापतीसाठी उमेदवार म्हणून जे हे नामनिर्देशन पत्र आहे ते अवैध ठरविण्यात येत आहे.

आता अ.क्र.३

नगर सचिव :अनुक्रमांक ३ दिनांक ६-४-२००९ रोजी प्राप्त नामनिर्देशन पत्र उमेदवाराचे नाव श्री.अ.साजेद अ.सत्तार सुचकाचे श्री.सिताराम इसराम सुरे अनुमोदकाचे नाव श्री.रविकांत काशिनाथ गवळी

मा.पिठासीन अधिकारी :(अ.क्र.३ चे नामनिर्देशन पत्र व त्यावर असलेली नामनिर्देशन सादर करणारे उमेदवार,सुचक व अनुमोदक यांचे सहया असल्याची प्रत्यक्ष विचारणा करून त्यावर त्यांनीच स्वाक्षरी केल्याबाबत पडताळणी केली ) हे नामनिर्देशन पत्र वैध ठरविण्यात येत आहे.

आता अ.क्र.४

नगर सचिव :अनुक्रमांक ४ दिनांक ६-४-२००९ रोजी प्राप्त नामनिर्देशन पत्र

उमेदवाराचे नाव श्री.अ.साजेद अ.सत्तार सुचकाचे श्री.कैसरखान बद्रोद्दीन खान अनुमोदकाचे नाव श्री.मोमीन सफिया फिरदोस

मा.पिठासीन अधिकारी :(अ.क्र.४ चे नामनिर्देशन पत्र व त्यावर असलेली नामनिर्देशन सादर करणारे उमेदवार,सुचक व अनुमोदक यांचे सहया असल्याची प्रत्यक्ष विचारणा करून त्यांनी स्वत:सही केल्याबद्दल त्यांना विचारणा करून खात्री करतात) हे नामनिर्देशन पत्र वैध ठरविण्यात येत आहे.
आता अ.क्र.५

नगर सचिव :अनुक्रमांक ५ दिनांक ८-४-२००९ रोजी प्राप्त नामनिर्देशन पत्र उमेदवाराचे नाव श्री.पाथ्रीकर दत्ताभाउ अन्नासाहेब सुचकाचे श्री.देसरडा प्रशांत सुभाष अनुमोदकाचे नाव श्री.घडमोडे भगवान देविदास

मा.पिठासीन अधिकारी :(अ.क्र.५ चे नामनिर्देशन पत्र व त्यावर असलेली नामनिर्देशन सादर करणारे उमेदवार,सुचक व अनुमोदक यांचे सहया असल्याची प्रत्यक्ष विचारणा करून त्यांनी स्वत:सही केल्याबद्दल त्यांना विचारणा करून खात्री करतात) हे नामनिर्देशन पत्र वैध ठरविण्यात येत आहे.
आता अ.क्र.६

नगर सचिव :अनुक्रमांक ६ दिनांक ८-४-२००९ रोजी प्राप्त नामनिर्देशन पत्र उमेदवाराचे नाव श्री.नारायण त्रिलोकचंद कुचे सुचकाचे श्री.पांडे विनायक प्रभाकर अनुमोदकाचे नाव श्री.कटकटे सतिष विश्वनाथ

मा.पिठासीन अधिकारी :(अ.क्र.६ चे नामनिर्देशन पत्र व त्यावर असलेली नामनिर्देशन सादर करणारे उमेदवार,सुचक व अनुमोदक यांचे सहया असल्याची प्रत्यक्ष विचारणा करून त्यांनी स्वत:सही केल्याबद्दल त्यांना विचारणा करून खात्री करतात) हे नामनिर्देशन पत्र वैध ठरविण्यात येत आहे. कृपया सदस्यांनी आपल्या जागेवर बसावे.

श्री.विनायक पांडे :दोन स.सदस्यांना जागा सोडून जबरदस्तीने दुस-या ठिकाणी बसवावयास लावतात माझा यास अक्षेप आहे.

मा.पिठासीन अधिकारी :कृपया.जे स.सदस्य ज्या ठिकाणी अगोदर बसलेले होते त्यांनी त्याच ठिकाणी बसावे.कृपया सभा संपेपर्यंत बसावे.
स्थायी समिती सभापती पदासाठी प्राप्त नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचे काम पूर्ण झाले असून खालीलप्रमाणे उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र वैध ठरलेले आहे.

१. श्री.अ.साजेद अ.सत्तार
२. श्री.पाथ्रीकर दत्ताभाउ अण्णासाहेब
३. श्री. नारायण तिलोकचंद कुचे

पिठासीन अधिकारी : छाननीत वैध ठरलेल्या नामनिर्देशनातून उमेदवारास नामनिर्देशन पत्र परत घ्यावयाचे असल्यास त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती,प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ चे नियम क्र. ५ (३) अन्वये १५ मिनिटांच्या आत उमेदवाराने सही केलेली लेखी सूचना पीठासीन अधिकारी यांना देवून त्यांना आपली उमेदवारी मागे घेता येईल. आता सभागृहातील घड्याळाप्रमाणे १२.०० वाजले असून

१२.१५ वाजेपर्यंत उमेदवारी मागे घेता येईल. तसेच नियम क्र.५ (४) अन्वये उमेदवारी मागे घेण्याची नोटीस दिल्यानंतर ती नोटीस रद्द करता येणार नाही.

कृपया सर्वांनी सभागृहातच आपआपल्या जागेवर बसावे.अशा सर्वांना सुचना आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर :आम्हाला विचारविनिमय करण्यासाठी परवानगी दयावी.

श्री.विनायक पांडे :फक्त उमेदवारांना विचारविनिमय करण्यासाठी परवानगी दयावी.

मा.पिठासीन अधिकारी :जे उमेदवार आहे त्यांना विचारविनिमय करण्यासाठी परवानगी देण्यात येते परंतू शांततेने विचारविनिमय करावे.

नगर सचिव :आता सभागृहातील घडयाळाप्रमाणे १२.१५ वाजले असून उमेदवारी मागे घेण्याची वेळ संपलेली आहे.

पिठासीन अधिकारी : आता सभागृहातील घड्याळाप्रमाणे.१२.१५ वाजले असून स्थायी समिती सभापती पदासाठी ०३ उमेदवारापैकी विहित मुदतीत खालील उमेदवारांनी स्वतःची सही करून पिठासीन अधिकारी यांना लेखी सूचना देवून आपले नामनिर्देशन/उमेदवारी अर्ज परत घेतले आहेत.

| अ.क्र. | उमेदवारी/नामनिर्देशन पत्र परत घेणाऱ्या उमेदवारांची नावे. |
|---|---|
| १. | श्री.नारायण तिलोकचंद कुचे |

जे सदस्य ज्या ठिकाणी बसलेले होते तेथेच स्थान ग्रहन करावे.

स्थायी समिती सभापती पदासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नांवे नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ चे नियम क्र.६ (२) नुसार प्राप्त नामनिर्देशनावरील नावांच्या वर्णानुक्रमाने लावण्यात आली असून ती खालीलप्रमाणे आहेत.

श्री.भगवान घडमोडे ::जे स.सदस्य इतर ठिकाणी बसलेले आहे त्यांना त्यांचे जागेवर बसविण्यात यावे.

मा.पिठासीन अधिकारी : सभा सुरू होते वेळी जे स.सदस्य पुर्वीच्या जागेवर बसलेले होते त्यांनी त्याच जागेवर बसावे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव |
|---|---|
| ०१. | श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार |
| ०२ | श्री.दत्ताभाउ अण्णासाहेब पाथ्रीकर |

पीठासीन अधिकारी : मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती,प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती पदाच्या निवडणूका घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ चे नियम क्र.६ (३) प्रमाणे हात वर करून मतांची नोंद घेण्यात येईल.

नगर सचिव : सभापती,स्थायी समिती निवडी संबंधी कार्यपध्दती

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती,प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ चे तरतुदी अन्वये सभापती, पदाच्या मतदान प्रक्रीया व निवडी संबंधी तरतुदी पुढील प्रमाणे आहेत.

०१. नियम ६ (१) अन्वये एकच वैध नामनिर्देशन करण्यात आले असेल तर पिठासीन अधिकारी अशा उमेदवाराची रितसर निवड झाल्याचे घोषित करेल.

०२. नियम ६ (२) अन्वये जर वैध नामनिर्देशित उमेदवारांची संख्या एकापेक्षा अधिक असेल, तर पीठासीन अधिकारी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नांवे वर्णानुक्रमे लावतील.

०३. नियम क्र.६ (३) अन्वये उमेदवारांचे नांव वर्णानुक्रमाने पुकारण्यात येईल. ज्यांचे नांव पुकारण्यात येईल, त्यांचेसाठी प्रथम हात वर करून मतदान घेण्यात येईल व त्यांना मिळालेल्या मतांची नोंद घेण्यात येईल व त्यांनी ज्या उमेदवाराच्या बाजुने मत दिले आहे, अशा स्थायी समिती सदस्यांचे नांवाची नोंद कार्यवृत्तांतात नोंदविण्यात येईल.

०४. नियम क्र.६ (४) (एक) अन्वये मत देण्यास इच्छूक असलेल्या प्रत्येक सदस्यास आपले मत देण्यासाठी रास्त व वाजवी संधी मा.पिठासीन अधिकारी देतील.

०५. नियम क्र.६ (४) (दोन) अन्वये ज्यांचे मत एकदा नोंदविण्यात आले आहे, अशा सदस्यास पुन्हा मत देण्याची किंवा आपले मत बदलण्याची मुभा असणार नाही.

०६. नियम क्र.६ (५) अन्वये ज्या सदस्यांनी मतदान केलेले नाही, त्यांची नोंद देखिल कार्यवृत्तांतात घेण्यात येईल.

०७. नियम ६ (७) अन्वये निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला मतदानाद्वारे मिळालेल्या मतांची संख्या पीठासीन अधिकारी घोषित करतील व ज्या उमेदवाराला मतदानात जास्त मते पडतील, तो उमेदवार रितसर निवडूण आल्याचे पीठासीन अधिकारी घोषित करतील.

०८. नियम क्र. ६ (८) अन्वये मते समसमान मिळाल्यास पीठासीन अधिकारी असे घोषित करील की, निवडणुकीचा निकाल चिठ्ठ्या टाकून सोडतीद्वारे ठरविण्यात येईल. उपस्थित आणि मत देण्यास हक्कदार असलेले स्थायी समिती सदस्य बहुसंख्येने ठरवतील अशा व्यक्तीकडून चिठ्ठी काढण्यात येईल.

०९. नियम क्र. ६ (९) अन्वये ज्या उमेदवाराच्या नांवाची चिठ्ठी निघेल तो उमेदवार उक्त पदावर वैध रीतीने निवडून आला असल्याचे पिठासीन अधिकारी घोषित करतील.

पीठासीन अधिकारी : आता वर्णानुक्रमाने उमेदवारांचे नांव घोषित करण्यांत येत आहे.

०१. श्री. अ.साजेद अ.सत्तार यांना ज्यांना मते द्यावयाचे आहेत त्यांनी उभे राहून आपले हात वर करून मत नोंदवावे. मी पुन्हा सांगते त्या सदस्यांनी उभे राहून हात वर करावे, मतदान गणना अधिकारी यांनी कृपया श्री.अ.साजेद अ.सत्तार यांना हात वर करून जे स्थायी समिती सदस्य मतदान करीत आहे, त्यांची नांवे लिहून घ्यावी व आपले स्वाक्षरीसह ती यादी माझेकडे सादर करावी.

(मतगणना अधिकारी श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार यांना हात

वर करून केलेल्या सदस्यांचे नावाची नोंद घेतात.)

श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार यांना हात वर करून मतदान केलेल्या स.सदस्यांची नांवे.

| अ.क्र. | स.सदस्यांचे नांव |
|---|---|
| ०१. | खान जावेद हसन खान कासीम हसन |
| ०२. | गवळी रविकांत काशिनाथराव |
| ०३. | मोमिन सफिया फिरदोस |
| ०४. | सुरे सिताराम इसराम |
| ०५. | सोनवणे कचरू श्रीपत |
| ०६. | अब्दुल साजेद अब्दुल सत्तार |
| ०७. | कैसर खान बद्रौद्दिन |
| ०८. | खान मेहरून्निसा हमीद खान |

मा.पीठासीन अधिकारी : ०२. श्री. पाथ्रीकर दत्ताभाउ अन्नासाहेब यांना ज्यांना मते द्यावयाचे आहे,त्यांनी आपले हात वर करून मत नोंदवावे. मतदान गणना अधिकारी यांनी कृपया श्री. पाथ्रीकर दत्ताभाउ अन्नासाहेब यांना हात वर करून जे स्थायी समिती सदस्य मतदान करीत आहे, त्यांची नांवे लिहून घ्यावी व आपले स्वाक्षरीसह ती यादी माझेकडे सादर करावी.

(मतगणना अधिकारी श्री.पाथ्रीकर दत्ताभाउ अन्नासाहेब यांना हात वर करून केलेल्या सदस्यांची नावे नोंदवून घेतात.)

श्री. पाथ्रीकर दत्ताभाउ अन्नासाहेब यांना हात वर करून मतदान केलेल्या स.सदसस्यांची नांवे.

| अ.क्र. | स.सदस्यांचे नांव |
|---|---|
| ०१. | सतिष विश्वनाथ कटकटे |
| ०२. | कुचे नारायण त्रिलोकचंद |
| ०३. | पाथ्रीकर दत्ताभाउ अन्नासाहेब |
| ०४. | घडमोडे भगवान देविदास |
| ०५. | देसरडा प्रशांत सुभाष |
| ०६. | निमगांवकर प्रल्हाद गणपत |
| ०७. | पांडे विनायक प्रभाकर |

| | | |
|---|---|---|
| एकूण हजर असलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या | - | १५ |
| मतदानात भाग घेतलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या | - | १५ |
| मतदानात भाग न घेतलेल्या स्थायी समिती सदस्यांची संख्या | - | ०० |

उमेदवारांना मिळालेली मते (चढत्या क्रमाने)

| | | |
|---|---|---|
| ०१. श्री.पाथ्रीकर दत्ताभाउ अन्नासाहेब | - | (०७) |
| ०२. श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार | - | (०८) |

वरीलप्रमाणे झालेल्या मतदानात स्थायी समिती सभापती पदासाठी श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार यांना सर्वात जास्त मते मिळालेली आहेत. त्यांची औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदावर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती,प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ अन्वये वैध रितीने निवड झाल्याचे याद्वारे घोषित करण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या मतदानानुसार श्री. अ. साजेद अ.सत्तार यांना सर्वात जास्त आठ (०८) मते मिळालेली आहेत. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २१ आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्याचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम २००७ व (सुधारणा) नियम २००८ अन्वये श्री. अ. साजेद अ. सत्तार यांची ०८ विरूध्द ०७ या बहुमताने निवड झाली. या निवडीस मान्यता देण्यात आली.

यानंतर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. पिठासीन अधिकारी यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद